# जाहीर लिलाव

## दिवाणी न्यायालय, क.स्तर देवरूख.

यावरून असे कळविणेत येते की, दिवाणी न्यायालय देवरुख या न्यायालयातील पुढील जडसंग्रहामधील वस्तु या मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश रत्नागिरी यांचा म.जा.क्र. वित्त ७६५८ सन २०२५ दिनांक १५/१२/२०२५ अन्वये जाहिर लिलाव करणेबाबत आदेश पारीत केला आहे. त्यास अनुसरून सदर जडसंग्रहामधील किलबर्न कंपनीचा इलेक्ट्रीक वजन काट्याचा पुढील वर्णन केल्याप्रमाणे जाहिर लिलाव करणेत येईल. कोणताही तहकूब हुकूम दरम्यान न झाल्यास, सदरहू लिलाव दिनांक ३०/१२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात येईल. सदर लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१. सदर परिशिष्ठातील वस्तुचे वर्णन हे न्यायालयातील डेड स्टॉक रजिस्टर मध्ये नमुद असल्याप्रमाणे बरोबर आहे. तथापी सदरहू वस्तुचे जाहिरनाम्यातील वर्णनाबद्दल अगर त्यातील त्रुटीकरीता न्यायालय बंधनकारक राहणार नाहीत.

२. लिलाव करणारा अधिकारी लिलावाची रक्कम किती चढवावी हे ठरविल. लिलाव दराची लॉट संबधी अगर मागणीदाराविषयी काही तक्रार निर्माण झाल्यास वस्तुचा फेर लिलाव करण्यात येईल.

३. सर्वात जास्त रक्कमेची मागणी करणारा तो लिलाव बोलल्यास कायदेशिररित्या पात्र आढळल्यास, वस्तुचा खरेदीदार म्हणून जाहिर करणेत येईल आणि सर्वात जास्त रक्कमेची मागणी नाकारण्याचा अधिकार खाली स्वाक्षरी करणार यानी राखुन ठेवला आहे.

४. विक्री करणा–या अधिका–यास आवश्यक वाटल्यास त्याचे तहकुबीची कारणे लेखी लिहून विक्री तहकूब करावी.

५. वस्तुंच्या विक्रीची किंमत ही विक्रीचे वेळी द्यावी लागेल किंवा विक्री करणारा अंमलदार सांगेल त्यावेळी न्यायालयात भरावी लागेल. तशी रक्कम न भरल्यास लिलाव पुन्हा करून वस्तुंची फेर विक्री केली जाईल. अशा फेर लिलावाचे वेळी मुळचे किंमतीपेक्षा कमी येणारी रक्कम न भरणारे मागणीदाराकडून वसूल केली जाईल.

आज दिनांक १७/१२/२०२५ रोजी आमचे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

CIVIL JUDGE J. D., DEORUKH
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख

दिवाणी न्यायाधीश क.स्तर
देवरूख.

म.जा.क्र. १६९८ /२०२५
दिवाणी न्यायालय, देवरुख.
दिनांक — १७/१२/२०२५

प्रत जाहीर लिलावाची नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी :—

१. मा.अधिक्षक, आस्था जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी
३. मा. तहसिलदार, देवरूख
४. सहाय्यक अधिक्षक, वित्त, दिवाणी न्यायालय, देवरूख
५. दिवाणी न्यायालय, देवरुख येथील नोटीस बोर्डावर डकविणेकरीता.
६. मुख्याधिकारी, नगरपंचायत देवरूख.
७. District System Administrator यांजकडे महाराष्ट्र शासनाच्या साईटवरती प्रसिध्द करणेकरीता.

## वस्तुंचे वर्णन

| अ.क्र. | जडसंग्रह | नोंदवहीमधील वस्तुचा क्रमांक | जडसंगहामधील वस्तुची मुळ किंमत | लिलावाची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | किलबर्न कंपनीचा इलेक्ट्रीक वनज काटा मॉडेल N-Series, Class IV, Capacity 2KG, Sr. No. 900557 | २ | रूपये ३८,९१८/ | रूपये — |

दिनांक — १७/१२/२०२५

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
देवरुख